नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे | Year - 2nd | अंक - २१८ | Issue - 218 | वार बुधवार दि. २५ डिसेंबर २०२४ | Blow- Wednesday Date 25 December 2024 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## थोडक्यात...

### १२ सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्या

मुंबई : राज्य सरकारने १२ सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या असून, उद्योग विभागाच्या सचिवपदी डॉ. पी. अनबलगन तर 'बेस्ट'च्या महाव्यवस्थापकपदी डॉ. हर्षदीप कांबळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

'बेस्ट'चे महाव्यवस्थापक अनिल डिग्गीकर यांची दिव्यांग कल्याण विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिवपदी बदली करण्यात आली आहे. डॉ. बी. राधाकृष्णन यांची 'महाजेनको' या वीज कंपनीच्या अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालकपदी नियुक्ती करण्यात आली आहे. तर संजय दैने (वस्त्रोद्योग आयुक्त, नागपूर), राहुल कर्डिले (नाशिक महानगरपालिका आयुक्त), सी. वनमती (जिल्हाधिकारी वर्धा), संजय पवार (सहआयुक्त विक्रीकर विभाग), अविशंत पंडा (गडचिरोली जिल्हाधिकारी), विवेक जॉनसन (मुख्य कार्यकारी अधिकारी, चंद्रपूर जिल्हा परिषद), अण्णासाहेब चव्हाण (मुख्य कार्यकारी अधिकारी, महात्मा फुले जीवनदायी आरोग्य योजना, मुंबई), गोपीचंद कदम (मुख्य कार्यकारी अधिकारी, सोलापूर स्मार्ट सिटी) आदींची नियुक्ती करण्यात आली आहे.

### तरसाच्या हल्ल्यात ऊसतोड मजूर महिला गंभीर जखमी

सांगली : उसतोडीसाठी बीड जिल्ह्यातून कडेगाव तालुक्यात आलेल्या एका महिलेवर मंगळवारी पहाटे तरसाने हल्ला केला. यामध्ये महिला जखमी झाली असून तिच्या डोक्याला इजा झाली आहे. तिच्यावर सांगलीच्या जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचार करण्यात येत आहेत. कडेगाव तालुक्यातील नेवरी ते हिंगणगादे रस्त्यावर नेवरी गावच्या शिवारात उसतोड मजूरांची हंगामी वस्ती (पाले) असून या ठिकाणी राहण्यास असलेल्या निंबाबाई रोहिदास राठोड (वय ४५ रा. बिबी, ता. लोणार जि. बुलढाणा) हिच्यावर मंगळवारी पहाटे साडेपाच वाजण्याच्या सुमारास अज्ञात हिंस्र प्राण्याने हल्ला केला. ही महिला अंगावर गोधडी पांघरूण व डोक्याखाली उशी घेऊन झोपली असताना प्राण्याने हल्ला केला. यामध्ये महिलेच्या डोक्याला मोठी जखम झाली असून हल्ला होताच महिलेने अचानक आक्रोश केला.

# लष्कराचे वाहन ३५० फूट दरीत कोसळले, पाच जवानांचा मृत्यू



## महिनाभरातील दुसरी घटना; पोलिस आणि लष्कराच्या पथकाकडून मदतकार्य, जखमींवर उपचार सुरु

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

नवी दिल्ली : मंगळवारी संध्याकाळी नियंत्रण रेषेजवळ झालेल्या भीषण अपघातात पाच जवान शहीद झाले. तसेच अनेक जवान जखमी झाले. बलनोई भागात लष्कराचे वाहन दरीत कोसळल्याने हा अपघात झाला. घटनास्थळी पोलीस आणि लष्कराच्या पथकांनी मदतकार्य सुरू केले आहे. इंडियन एक्स्प्रेसने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे.

तर, इंडिया टुडेने दिलेल्या वृत्तानुसार, ११ मद्रास लाइट इन्फंट्री (११ चडख) चे वाहन निलम मुख्यालय ते बालनोई घोरा पोस्टकडे जात असताना हा अपघात झाला. वाहन गंतव्यस्थानाजवळील दरीत अंदाजे ३५० फूट खाली कोसळले. अपघाताची माहिती मिळताच ११ एमएलआयच्या क्विक रिक्शन टीमने बचाव कार्य करण्यासाठी घटनास्थळी धाव घेतली. जखमी जवानांना तात्काळ वैद्यकीय मदत देण्यात आली असून त्यांना उपचारांसाठी बाहेर काढण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

गेल्या महिन्यात झालेल्या अशाच अपघातात जम्मू-काश्मीरच्या राजौरी जिल्ह्यात एका लष्करी जवानाचे वाहन रस्त्यावरून घसरून दरीत पडल्याने एका जवानाचा मृत्यू झाला होता.

तर एकजण जखमी होता. कालाकोट येथील बडोग गावाजवळ ४ नोव्हेंबर रोजी झालेल्या या अपघातात नाईक बद्रीलाल आणि शिपाई जय प्रकाश गंभीर जखमी झाले आणि त्यांना तातडीने जवळच्या रुग्णालयात हलवण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान बद्रीलाल यांचा मृत्यू झाला. २ नोव्हेंबर रोजीही, जम्मू आणि काश्मीरच्या रियासी जिल्ह्यात एक महिला आणि तिच्या १० महिन्यांच्या मुलासह तिघांचा मृत्यू झाला आणि त्यांची कार डोंगराळ रस्त्यावरून घसरून खोल दरीत कोसळली होती.

# बीडमध्ये कुणाचीही दादागिरी खपवून घेतली जाणार नाही : मुख्यमंत्री फडणवीस

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

बीड : बीड जिल्ह्याच्या केज तालुक्यातील मस्साजोग या गावचे सरपंच संतोष देशमुख यांची अपहरण करून अत्यंत क्रूर पद्धतीने हत्या करण्यात आल्याची घटना काही दिवसांपूर्वी घडली. या घटनेनंतर संपूर्ण राज्यात मोठी खळबळ उडाली. या प्रकरणाचे पडसाद हिवाळी अधिवेशनात देखील उमटले. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत निवेदन देत या संपूर्ण घटनेची माहिती दिली. तसेच या घटनेची एसआयटी आणि न्यायालयीन चौकशी करण्यात येणार असल्याची घोषणा केली. दरम्यान, संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणावर राजकीय वर्तुळातून संतप्त प्रतिक्रिया येत आहेत. भाजपाचे आमदार सुरेश धस यांनी देखील या घटनेबाबत विधानसभेत आवाज उठवला.



बीड जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्थेच्या संदर्भात बोलताना आमदार सुरेश धस यांनी देवेंद्र फडणवीस यांनी बीड जिल्ह्याचं पालकमंत्री पद स्वीकारावं, अशी मागणी केली. तसेच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपींवर कडक कारवाई करावी, अशी मागणी केली. तसेच या प्रकरणातील काही आरोपी अद्याप फरार आहेत त्यांनाही तातडीने अटक करण्याची मागणी आमदार सुरेश धस यांनी केली. तसेच खासदार सुप्रिया सुळे यांनीही या घटनेवरून सरकारवर टीका केली. या संपूर्ण प्रकरणावर आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भाष्य केलं. तसेच यावेळी बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री पदाबाबतही त्यांना प्रश्न विचारण्यात आला असता त्यावर देवेंद्र फडणवीस यांनी सूचक प्रतिक्रिया दिली.

बीड जिल्ह्याचं पालकमंत्री पद तुम्ही (देवेंद्र फडणवीस यांनी) घ्यावं अशी मागणी आमदार सुरेश धस यांनी केली आहे. यावर प्रतिक्रिया काय? असं देवेंद्र फडणवीस यांना माध्यमांच्या प्रतिनिधींनी विचारलं असता ते म्हणाले की, बीड जिल्ह्याचं पालकमंत्री पद कोणी घ्यायचं? यासंदर्भात मी (देवेंद्र फडणवीस), उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार आम्ही मिळून ठरवू. मग बीड जिल्ह्याचं पालकमंत्री पद कोणी घ्यायचं? कोणाकडे द्यायचं? याची चर्चा करू. मात्र, बीड जिल्ह्यात कोणाचीही दादागिरी आम्ही चालू देणार नाही, असं देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं.

बीड आणि परभणीच्या घटनेवर बोलताना खासदार सुप्रिया सुळे यांनी म्हटलं आहे की, बीड आणि परभणीची घटना कोणत्याही राज्याला शोभणारी नाही. अस्वस्थ करणाऱ्या या घटना आहेत. या दोन्ही घटनेत न्याय मिळाला नाही तर पुढचा महाराष्ट्र कसा असेल? याबाबत माझ्या मनात भिती वाटते, असं म्हणत सुप्रिया सुळे यांनी राज्य सरकारवर टीका केली. या टिकेला प्रत्युत्तर देताना देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं की, महाराष्ट्र हे देशातील दुसऱ्या कोणत्याही राज्यपेक्षा सुरक्षित राज्य आहे. पण प्रत्येक घटनेचं एवढं राजकारण करणं हे विरोधकांना शोभत नाही.

# २ कोटी २३ लाख लाभार्थींपैकी ६७ लाख बहिणींना अनुदान वाटप

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

मुंबई : 'मुख्यमंत्री लाडकी बहीण योजने'चा डिसेंबर महिन्याचा लाभ देण्यास मंगळवारपासून सुरुवात झाली. एकूण २ कोटी २३ लाख लाभार्थींपैकी ६७ लाख बहिणींना १५०० रुपयांचे अनुदान वाटप करण्यात आले. विधानसभा निवडणुकीमुळे नोव्हेंबरचे अनुदान ऑक्टोबरमध्ये वाटण्यात आले होते.



डिसेंबर महिन्याचे पैसे देण्यास मंगळवारपासून सुरुवात झाली.

### १२ लाखांवर नवे लाभार्थी

**आतापर्यंत एकदाही लाभ न मिळालेल्या १२ लाख ८७ हजार बहिणींना सहा महिन्यांचे एकूण नऊ हजार बँक खात्यात जमा करण्यात आले. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा महायुती सरकारला विधानसभा निवडणुकीत फायदा झाला. राज्यातील लाभार्थी बहिणींनी केलेल्या मतदानामुळे महायुतीला घवघवीत यश मिळाले.**

२ कोटी ३४ लाख लाडक्या बहिणींपैकी ६७ लाख बहिणींच्या खात्यात पहिल्या दिवशी रक्कम जमा झाली आहे. पुढील दोन ते तीन दिवसांत सर्व महिलांच्या खात्यात रक्कम जमा होईल, असे सांगण्यात आले.

ज ु ल ै महिन्यापासून सुरू झालेल्या या योजनेसाठी राज्यातून २ कोटी ६३ लाख अर्ज आले होते. त्यापैकी २ कोटी ४७ लाख अर्ज पात्र ठरले. १२ लाख ८७ हजार बहिणींचे बँक खाते आधार कार्डशी जोडले गेले नव्हते. त्यांना निवडणुकीपूर्वी योजनेचा लाभ मिळाला नाही. दोन कोटी ३४ लाख बहिणींना ऑक्टोबर महिन्यात नोव्हेंबर पर्यंतचे प्रत्येकी १५०० हजार रुपये प्रमाणे साडेसात हजार रुपये बँक खात्यात जमा केले गेले होते. डिसेंबरचा लाभ देण्यासाठी एक हजार ४०० कोटी रुपयांची तरतूद केली.

आदिती तटकरे यांच्याकडे महिला विकास विभाग कायम राहिल्याने त्यांनी शनिवारी खातेवाटप झाल्यानंतर डिसेंबर महिन्याचा लाभ देण्याच्या कामाला गती दिली.

**आरोपीचा पर्दापाश करण्यात मोहोळ पोलिसांना यश**

**सालगडीने केला शेतमालकाचा खून**

# सोन्याच्या लोभासाठी अपहरणाचा बनाव करून निर्घृण हत्या

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी

सोन्याच्या लोभासाठी अपहरणाचा बनाव करून निर्गुण हत्या करणाऱ्या आरोपीचा पर्दाफाश करण्यात घोळ पोलिसांना यश आले आहे.

मोहोळ पोलीस ठाणे येथे दिनांक १५/१२/२०२४ रोजी इसम नामे कृष्णा नारायण चामे वय ५२ वर्ष सध्या राहणार यल्लमा वाडी तालुका मोहोळ या मिसिंग झाल्याबाबत सदर मिसिंगच्या तीन दिवसाचा तपासानंतर सर्वत्र मिसिंग व्यक्तीची विविध ठिकाणी शोध घेतला तसेच मिसिंग व्यक्तीची सर्व जिल्ह्यातील तसेच आसपासच्या जिल्ह्यातील पोलीस ठाण्यास तपास यादी पाठवून मिसिंग व्यक्तीचे मोबाईलचा सीडीआर काढून त्याचे अवलोकन केले परंतु सदर मिसिंग व्यक्ती बाबत काही एक माहिती मिळून आली नाही.

सदर मिसिंग मध्ये दिनांक १७/१२/२०२४ रोजी सदर प्रकरणाचे गांभीर्य ओळखून नमूद मिसिंग व्यक्ती बाबत अपहरणाचा गुन्हा दाखल केला व सदर अपहरणाची तपासात अपहरण व्यक्तीचे शेतातील सालगडी सचिन भागवत गिरी यांच्याकडून माहिती मिळाली की, सदर ऑफरण इसमात एका अज्ञात व्यक्तीने मोटरसायकलीवर घेऊन गेल्याची माहिती मिळाली सदर प्रकरणातील कृष्णा चामे यांचे घर हे शेतामध्ये फॉरेस्टला लागून आहे सदर घराच्या आसपास साधारणता ०५ते०६ किलोमीटर अंतरापर्यंत शेती व फॉरेस्ट ची जमीन आहे त्यामुळे सदर ठिकाणी राहती लोकवस्ती अगर सीसीटीव्ही सारखी तांत्रिक मदत मिळत नव्हती तरी देखील घटनेच्या ०५ते०६ किलोमीटर क्षेत्राचे बाहेरील रोडवर जाऊन सीसीटीव्ही चेक करण्यात आलेली होती परंतु उपयुक्त माहिती मिळत नव्हती अपहरण व्यक्ति कृष्णा चामे यांचा मोबाईल देखील घरीच मिळून आलेला होता त्याच्या सीडीआर काढून सर्व संशयित व्यक्तींचा अभ्यास केला असता गुन्ह्याची तपास उपायुक्त माहिती मिळवून येत नव्हती.

अभी समना मे कृष्णा चामे व त्यांचे कुटुंबीयांचे बँक स्टेटमेंट मध्ये इतर लोकांसोबत आर्थिक व्यवहार व अभ्यास केला असता अफवात व्यक्तीचे आस्वादच्या दहा ते बारा गावात आर्थिक व्यवहार असलेली दिसून आल्याने त्या सर्व लोकांकडे सदरबाबत तपास केला परंतु त्यातूनही गुन्ह्याचे तपशीयुक्त काही एक मिळून आले नाही कृष्णा चामे यांचा फोटो प्रसार माध्यमाद्वारे प्रसारित करून आसपासच्या सर्व गरजेच्या ठिकाणी बस स्टॅन्ड रेल्वे स्टेशन हॉटेल या ठिकाणी आपण व्यक्तीचे फोटो प्रसिद्ध केले तसेच घटनेच्या ठिकाणची आसपासचे सर्व नदी नाले विहिरी, कॅनॉल, फॉरेस्ट असे, आसपासचे सर्व ठिकाणी शोध घेतला असता अपवाद व्यक्ती मिळून आली नाही. अशाप्रकारे सलग पाच दिवस अपहरण व्यक्तिचा तपास करून देखील काहीही भरीव माहिती मिळाली नाही मात्र अपहरण व्यक्तीच्या शेतात सालगडी म्हणून राहणारा.

सचिन भागवत गीरी वय पंचवीस वर्षे तालुका सांगवी जिल्हा धाराशिव यांच्या चौकशीत विसंगती समोर येत होती तेव्हा सचिन गिरी यास संशयित म्हणून ताब्यात घेऊन त्याच्याकडे गुण्याची अनुषंगाने सखोल चौकशी केली असता सदरचा गुन्हा हा त्याने स्वतः केल्याची कबुली दिली व सदरचा गुन्हा हा त्याने आर्थिक कारणाने व सोन्याच्या लोभासाठी केल्याचे सांगितले आहे तसेच सदर कृष्णा चामे यास त्याने डोक्यात वारंवार हातोडा घालून प्रथम ठार मारले व त्यानंतर त्याने धारदार हत्यार्याने त्याचे शरीराची तुकडे तुकडे करून ती वेगवेगळे पॉली पॅक कॅरीबॅग मध्ये भरून मताचे स्वच्छालयाच्या शोष खड्ड्यात करून ठेवले होते तसेच मयताच्या अंगावरील सुमारे १८ ते १९ तोळे सोने लॉकेट, व सोन्याची कडे असे त्यांनी मयताच्या घरासमोरील खड्ड्यात पुरले असल्याचे सांगितले तसेच सदरची हत्या त्यांनी एकट्यानेच केले असल्याचे सध्याचे सांगत आहे तरी परंतु गुन्ह्याच्या तपासात अधिक तपास करून आणखीन सह आरोपी आहेत अगर कसे याबाबत तपास करीत आहे सदर आरोपी नामे सचिन भागवत गीरी वर्षे २५ राहणार सांगवी जिल्हा धाराशिव यास गुन्ह्याचे तपासात अटक करून होण्याचा पुढील तपास पोलीस निरीक्षक श्री रणजीत माने मोहोळ पोलीस ठाणे हे करीत आहे. सदर अटक आरोपी सचिन भागवत गिरी यांचे विरुद्ध धाराशिव जिल्ह्यातील आंबी पोलीस ठाणे येथे यापूर्वी तीन चोरी विषय गुन्हे असल्याचा अभिलेख मिळून आलेला आहे.



सदरची उल्लेखनीय कामगिरी ही श्री अतुल कुलकर्णी पोलीस अधीक्षक सोलापूर ग्रामीण श्री प्रीतम यावलकर अप्पर पोलीस अधीक्षक सोलापूर ग्रामीण, श्री विलास वामनवार उपविभागीय पोलीस अधिकारी अक्कलकोट, श्री संकेत देवळेकर उपविभागी पोलीस अधिकारी सोलापूर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री रणजीत माने मोहोळ पोलीस निरीक्षक सह पोलीस निरीक्षक श्री किरण पाटील पोलीस उपनिरीक्षक श्री गजानन करणेवाड व श्री अजय केसकर देवीपत्रातील पोलीस हेडकॉन्स्टेबल दयानंद हेंबाडे, पोलीस कॉन्स्टेबल संदेश पवार पोलीस चंद्रकांत ढवळे पोलीस कॉन्स्टेबल अमोल जगताप संदीप सावंत विराज राठोड पोलीस ठाण्याकडे पोलीस कॉन्स्टेबल समाधान पाटील संतोष चव्हाण पोलीस कॉन्स्टेबल धनाजी घोरपडे कैलास डावखुरे पोलीस कॉन्स्टेबल शैलेश शिवनेरी साठी अनिल वाघमारे डीवायएसपी कार्यालयकडील प्रदीप सह पोलीस निरीक्षक शरद डावरे अशपाक शेख , पोलीस कॉन्स्टेबल देवा सोनलकर यांनी बजावली आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मनुस्मृतीचे दहन का केले होते?

मित्र हो

आपण सर्वांना ज्ञात आहे की, इतिहासात २५ डिसेंबर १९२७ ला अनन्यसाधारण महत्त्व आहे. ते यासाठी की, २५ डिसेंबर १९२२७ ला पूर्वनियोजित कार्यक्रमानुसार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मनुस्मृतीच्या दहनाचा कृती कार्यक्रम घडवून आणला होता. अशा प्रकारची एका ग्रंथ वेड्या पुस्तक प्रेमी व्यक्तींने टोकाची भूमिका का पार पाडली असावी? असा प्रश्न आपल्या समोर आ वासून अनुत्तरित राहतो, म्हणून हे दोन शब्द लेखणीबद्ध करण्याचा हा त्रोटक प्रयत्न आहे.



माणवीय समाजात प्रत्येक व्यक्तीने माणुसकीच्या दृष्टीकोनातून इतर व्यक्तींशी व्यक्तीप्रमाणे वागणे अपेक्षित आहे. मात्र भारतीय समाजजीवनातील व्यक्ती तसे करताना दिसत नाहीत. उलटपक्षी समाज नियंत्रित करणा-यांनी अमानवीय दृष्टीकोनातून समाजाचे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र अशा चार वर्णात शास्त्रपरत्वे विभाजन केले तर रुढीपरत्वे अतिशूद्राची भर घालून पाच वर्णात विभाजन केल्याने आपापसांतील सहवासाला मर्यादा आल्या होत्या. मनुस्मृतीप्रमाणे वर्णव्यवस्थेत या सर्वांचा दर्जा असमान, विषम असल्याने उच्च दर्जा असणारे निम्न दर्जा असणाऱ्यांवर अत्याचार करण्याचा जन्मसिद्ध अधिकार प्राप्त झाल्याप्रमाणे वागत असतात. याची अंमलबजावणी व्हावी म्हणून त्यांच्यावर बेटी बंदी, रोटी बंदी, लोटी बंदी व भेटी बंदी घालण्यात आली आहे. यातील बंधन ज्यांना लागू पडत नाही, असा वर्ग म्हणजे ब्राह्मण वर्ग होय. जे स्वत:ला सर्वश्रेष्ठ समजतात. ज्यामुळे समाज असमानतेच्या विळख्यात जखडून राहिल्याने मानवीय दृष्टीकोनातून विकसित होऊ शकला नाही. परिणामी महाड येथे चवदार तळ्याचा सत्याग्रह घडवून आणण्याची योजना आखण्यात आली होती. ती केवळ पाणी पिऊन तहान भागविण्यासाठी नव्हे! तर इतरांप्रमाणे आम्हीही माणसे आहोत हे सिद्ध करून समतेची मुहूर्तमेढ रोवण्यासाठी या सभेचे आयोजन होते. अशाप्रकारची सभा यापूर्वी कुठे भरविण्यात आली होती काय? याचा शोध घेतला तर २४५ वर्षापूर्वी २४ जानेवारी १७८९ ला युरोप खंडातील फ्रान्स मध्ये तेथील १६ व्या लुई राजाने एक पत्र काढून ५ मे १७८९ ला व्हर्साय ला जनतेच्या प्रतिनिधींची सभा बोलावली होती. त्याला इतिहासात फ्रेंच राज्यक्रांती असे म्हणतात.

त्या काळात सुद्धा फ्रान्स मध्ये वर्णव्यवस्था अस्तित्वात होती. मात्र तिथे त्रैवर्णिक व्यवस्था होती. ज्यात वैश्य, शूद्र व अतिशूद्र अशी विभागणी तिथे नव्हती. परंतु या सर्वांसाठी एकच वर्ण होता. अशाप्रकारे फ्रान्स मधील व भारतातील हिंदू समाजात वर्णाश्रमव्यवस्था समान होती. त्या काळात फ्रेंच लोकांच्या विकासासाठी त्यांना त्यांच्यात राजकीय, सामाजिक व धार्मिक अशा प्रकारचे संघटन निर्माण करावयाचे होते. महाड सत्याग्रहातून आपणास मात्र सामाजिक व धार्मिक स्तरावर जनतेचे संघटन करणे अपेक्षित होते. याचा विचार करता फ्रेंच लोकांनी या अनुषंगाने काय भूमिका पार पाडली? याचा विचार करणे संयुक्तिक ठरेल. तर त्यांनी १७ जून १७८९ ला पहिला जाहिरनामा काढला त्यानुसार त्रैवर्णिक व्यवस्थेचे उच्चाटन करून एकजिनसी मानवीय दृष्टीकोनातून समाज निर्माण करण्याचे ठरविण्यात आले. पुढे दुसऱ्या जाहीरनाम्याप्रमाणे धर्मोपदेशक निवडण्याचे पोपचे अधिकार काढून धर्माधिकारी वर्गाचे स्वयंभूपण नाहिसे करण्यात आले. तिसरा जाहिरनामा हा तेथील राजकीय, आर्थिक व धार्मिक व्यवस्थेशी संबंधित होता ज्याचे दूरगामी परिणाम जागतिक स्तरावर झाले. या जाहीरनाम्याची एकंदरीत १७ कलमे होती. ज्यात स्वातंत्र्य, समता, मित्रता व न्याय अंतर्भूत होते. अशाप्रकारे फ्रेंच सभेची क्रांतिकारक प्रतिमा आपल्या डोळ्यासमोर उभी ठेवून त्याची अंमलबजावणी करण्यासाठी आपण वर्णव्यवस्था उध्वस्त करून एकजिनसी मानवीय समाज निर्माण करण्यासाठी हिंदूचे संघटन तयार केले पाहिजे. करिता छोटा उद्देश ठेवणे हा गुन्हा आहे. (ड्ुळा खी उीळाश.) करिता आपण उच्च कोटीचे ध्येय डोळ्यासमोर ठेवून कार्यरत राहिले पाहिजे. तसेच कुठल्याही रोगाची रोगपरिक्षा नीट केली तर योग्य औषधोपचार करून तो आजार लवकरात लवकर बरे करता येईल. अन्यथा अंदाजे केलेल्या उपाय योजनांनी आजाराची तीव्रता वाढून केवळ कालावधी वाढत जाईल. (If the disease is not rightly diagnosed the remedy will be useless and the cure may be postponed.) असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या प्रसंगी स्पष्ट केले होते. त्याचे मर्म समजून घेणे क्रम प्राप्त आहे.

अशाप्रकारे पहिल्या दिवसाच्या कार्यवाहीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भाषण संपल्यावर हिंदू व्यक्तीच्या जन्म सिद्ध हक्काच्या जाहिरनाम्यात एकूण चार ठराव मांडण्यात आले. ज्यात पहिल्या ठरावात सहा उपठराव होते. याप्रमाणे श्रुती, स्मृती व पुराणे वगैरे अवैज्ञानिक ग्रंथप्रामाण्य नाकारण्यात आले होते. म्हणून शूद्र जातीचा उपमर्द करणारी, प्रगती खुंटविणारी, आत्मबल नष्ट करून सामाजिक, राजकीय व आर्थिक गुलामगिरी कायम करणारी वचने ध्यानात घेऊन हिंदू मात्राच्या जन्म सिद्ध हक्काच्या जाहिरनाम्यात गोवलेल्या तत्वांशी तुलना करून मनुस्मृती हा ग्रंथ 'धर्मग्रंथ' या पवित्र नावास शोभण्यास अपात्र असल्याचे एकमत त्या परिषदेचे झाल्याने ते व्यक्त करण्यासाठी असलेल्या लोकविग्रही व माणूसकिचा उच्छेद करणा-यां धर्मग्रंथाचा दफनविधी करीत आहे. असा ठराव क्रमांक दोन रा. गंगाधर नीळकंठ सहस्रबुद्धे यांनी मांडला होता ज्याला रा. राजभोज यांनी अनुमोदन दिले तर रा. थोरात यांनी पुष्टी केली.



या ठरावाची अंमलबजावणी करण्यासाठी सत्याग्रह सभेतील मनुस्मृतीची दहनभूमी तयार करायला सहा कारागीर दोन दिवस खपत होते. सहा इंच खोल व सुमारे दीड फूट चौरस खड्डा खणून तो चंदनाच्या लाकडांनी भरून काढला होता. चार फूट उंचीचे चार खांब चार कोनावर उभे केले होते. 'मनुस्मृतीची दहनभूमी', 'अस्पृश्यता नष्ट करा', व 'भिक्षुकशाहिला गाडून टाका' अशा पताका तीन बाजूंनी लावल्या होत्या. २५ डिसेंबर १९२७ ला रात्री ९ वाजता बापुसाहेब सहस्त्रबुद्धे व पाच सहा अस्पृश्य साधू यांच्या या दहनभूमीवर मनुस्मृतीचे पुस्तक ठेवून ते जाळण्यात आले.

अशाप्रकारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हा मनुस्मृती दहनाचा प्रत्यक्ष कृती कार्यक्रम घडवून आणला आहे. तरी आपल्या पक्ष, संघटना, संस्था आणि आपण अनुयायी म्हणून या अनिष्ट विचारांचा आपल्या आचरणातून नायनाट केला आहे काय? हा प्रश्न अनुत्तरित राहतो. त्याची समर्पक उत्तरे शोधून मार्गक्रमण करणे ही आपली सर्वांचीच जबाबदारी आणि कर्तव्य आहे. अशी अपेक्षा बाळगून मी माझ्या शब्दाला येथे तूर्तास विराम देतो.

जय भीम!
जय पिपल्स व्हाईस!!
जय भारताचे संविधान!!!

लेखक : बी. बी. मेश्राम, नॅशनल कौन्सिल ऑफ दि ऑल इंडिया नाग असोसिएशन (आईना), संचालक : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल, छत्रपती संभाजी नगर, महाराष्ट्र.
संपर्क : ९४२१६७८६२८
stdbbm@gmail.com

संपादकीय....

## निवडणुकीनंतरचा पहिला टप्पा

'मुख्यमंत्री लाडकी बहीण योजने'चा डिसेंबर महिन्याचा लाभ देण्यास मंगळवारपासून सुरुवात झाली. एकूण २ कोटी २३ लाख लाभार्थींपैकी ६७ लाख बहिणींना १५०० रुपयांचे अनुदान वाटप करण्यात आले. विधानसभा निवडणुकीमुळे नोव्हेंबरचे अनुदान ऑक्टोबरमध्ये वाटण्यात आले होते. डिसेंबर महिन्याचे पैसे देण्यास मंगळवारपासून सुरुवात झाली. २ कोटी ३४ लाख लाडक्या बहिणींपैकी ६७ लाख बहिणींच्या खात्यात पहिल्या दिवशी रक्कम जमा झाली आहे. पुढील दोन ते तीन दिवसांत सर्व महिलांच्या खात्यात रक्कम जमा होईल, असे सांगण्यात आले. जुलै महिन्यापासून सुरू झालेल्या या योजनेसाठी राज्यातून २ कोटी ६३ लाख अर्ज आले होते. त्यापैकी २ कोटी ४७ लाख अर्ज पात्र ठरले. १२ लाख ८७ हजार बहिणींचे बँक खाते आधार कार्डशी जोडले गेले नव्हते. त्यांना निवडणुकीपूर्वी योजनेचा लाभ मिळाला नाही. दोन कोटी ३४ लाख बहिणींना ऑक्टोबर महिन्यात नोव्हेंबर पर्यंतचे प्रत्येकी १५०० हजार रुपये प्रमाणे साडेसात हजार रुपये बँक खात्यात जमा केले गेले होते. डिसेंबरचा लाभ देण्यासाठी एक हजार ४०० कोटी रुपयांची तरतूद केली. आदिती तटकरे यांच्याकडे महिला विकास विभाग कायम राहिल्याने त्यांनी शनिवारी खातेवाटप झाल्यानंतर डिसेंबर महिन्याचा लाभ देण्याच्या कामाला गती दिली. आतापर्यंत एकदाही लाभ न मिळालेल्या १२ लाख ८७ हजार बहिणींना सहा महिन्यांचे एकूण नऊ हजार बँक खात्यात जमा करण्यात आले. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा महायुती सरकारला विधानसभा निवडणुकीत फायदा झाला. राज्यातील लाभार्थी बहिणींनी केलेल्या मतदानामुळे महायुतीला घवघवीत यश मिळाले.

# माती आणि पाण्याची समस्या...

भारतात शेती हा अजूनही बहुतांश लोकांच्या उपजीविकेचा स्रोत आहे. १.७८ दशलक्ष चौरस किलोमीटर क्षेत्रामध्ये पसरलेल्या जगातील दुसऱ्या क्रमांकाच्या कृषी प्रणालीचा आधार आहे. मातीची धूप होण्याची गंभीर समस्या धान्य उत्पादनावरच परिणाम करत नाही, तर हवामान बदलाच्या युगात अनेक समस्यांचे मूळ बनत आहे. त्यात प्रामुख्याने पर्यावरणीय असंतुलनाचा समावेश होतो.



किंवा जमिनीच्या वर उपलब्ध असलेले सैल आणि मऊ घटक बियाणे अंकुरित करतात, मुळे फुटतात आणि झाडे आणि पिके वाढवतात ही आपल्या पृथ्वीवरील जीवनाची प्रातिनिधिक ओळख आहे. आजच्या युगात, आठ अब्ज लोकांसाठी अन्न उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी बिघडत चाललेल्या परिसंस्थेचा समतोल राखणे आवश्यक आहे. हवामान संकट मोठ्या प्रमाणात कमी करण्यासाठी झाडे आणि पिके हा एक मजबूत सक्षमकर्ता आहे; परंतु आज निसर्गाचे अस्तित्व, स्थिर आणि जंगम आणि प्राण्यांसाठी पोषक माती गंभीर धोक्यात आहे. मोठ्या प्रमाणावर मातीची धूप केवळ कृषी उत्पादन आणि अन्न सुरक्षेवर परिणाम करत नाही, तर हवामान बदलाची समस्या अधिक व्यापक आणि जटिल बनवत आहे. मातीचा ऱ्हास, उत्पादन क्षमतेत घट आणि आधुनिक कृषी पद्धतींमुळे या समस्येची व्याप्ती दिवसेंदिवस नवीन क्षेत्रांमध्ये पसरत आहे. 'नॅशनल ब्यूरो ऑफ सॉईल सर्व्हे'नुसार, भारतातील सुमारे एक तृतीयांश माती म्हणजे सुमारे १२० दशलक्ष हेक्टर मातीची धूप झाली. तिचा एक महत्त्वपूर्ण भाग सागरी क्षारीकरणामुळे प्रभावित झाला आहे. भारतातील बहुतेक राज्ये मातीची धूप होण्यामुळे प्रभावित आहेत. पंजाब, हरियाणा, गुजरात, महाराष्ट्र, आंध्र प्रदेश आणि तेलंगणा सर्वाधिक प्रभावित झाले आहेत. मोठ्या प्रमाणावर मातीची धूप होत असूनही, तंत्रज्ञानावर आधारित शेतीमुळे अन्न उत्पादनात वाढ झाली आहे. भारत आता कृषी उत्पादनाचा दुसरा सर्वात मोठा उत्पादक देश आहे. अन्नधान्य उत्पादनात स्वयंपूर्ण आहे; परंतु कुपोषण ही अजूनही एक गंभीर समस्या आहे. पुराच्या वेळी मोठ्या प्रमाणावर मातीची धूप आणि बांधकामासाठी मोठ्या प्रमाणात जमिनीचा वापर, रासायनिक खतांच्या मोठ्या प्रमाणावर वापरामुळे क्षारता जमा होणे, वाढती आंलता आणि पाणी साचणे इत्यादींमुळे शेतीयोग्य जमिनीचा मोठा भाग नापीक होत आहे; परंतु मातीची अशीच झीज होत राहिल्यास, येत्या काही वर्षांमध्ये अन्न आयात करावे लागेल.

जगातील केवळ २.४ टक्के भूभाग असलेला भारत जगाच्या १८ टक्के लोकसंख्येला अन्न पुरवतो. अनियंत्रित शेती व्यतिरिक्त, मातीची धूप होण्याची प्रमुख कारणे म्हणजे मोठ्या प्रमाणावर शहरीकरण आणि औद्योगिकीकरणाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी जमिनीच्या वापरात होणारा व्यापक बदल. त्यात अविवेकी जंगलतोडदेखील समाविष्ट आहे. यासोबतच जनावरांच्या संख्येच्या बाबतीतही भारत हा सर्वात मोठा देश आहे. जनावरे चरताना जमिनीच्या वरच्या वनस्पती थराचा ऱ्हास होतो. वनस्पती काढून टाकल्यामुळे मातीचा वरचा थर कमकुवत होतो आणि पाऊस तसेच वाऱ्यामुळे मातीची धूप होते. भारत हा लोकसंख्येच्या दृष्टीने जगातील सर्वात मोठा देश आहे आणि दीड अब्ज लोकांच्या पोटापाण्यासाठी लागणारे धान्य उत्पादन करण्यासाठी कृषी व्यवस्थेवर सतत दबाव असतो. या सर्वांचा परिणाम संपूर्ण कृषी व्यवस्थेच्या मुळाशी असलेल्या मातीवर होतो. सध्या शेतीमध्ये ९४ टक्के रासायनिक खतांचा वापर केला जातो. रासायनिक कीटकनाशके आणि खतांच्या अतिवापरानेही शेतात आणि पिकांना विषबाधा झाली. भारत हा कीटकनाशकांचा सर्वात मोठा उत्पादक आणि वापरकर्तादेखील आहे. हरितक्रांतीच्या काळात आपले अन्नधान्य उत्पादन ५० दशलक्ष टनांवरून ३०० दशलक्ष टनांपर्यंत वाढले; परंतु हे यश सुपीक मातीची किंमत मोजून मिळालेले दिसते. अशा परिस्थितीत, जलद मातीचा नाश भारताच्या वाढत्या लोकसंख्येसाठी अन्नसुरक्षेचे गंभीर संकट निर्माण करू शकते. मातीची धूप झाल्यामुळे जमिनीची उत्पादकता कमी होतेच; पण नैसर्गिकरीत्या जमिनीत असलेल्या कार्बनचे प्रमाण कमी झाल्यामुळे पाणी शोषून घेण्याची आणि धरून ठेवण्याची क्षमताही मोठ्या प्रमाणात कमी होते. परिणामी, पाऊस आणि इतर स्रोतांमधून पाण्याचे पुनर्भरणदेखील लक्षणीय प्रमाणात कमी होते. त्यामुळे भारतातील भूजल पातळी मोठ्या प्रमाणात कमी होते.

कृषी-आधारित अर्थव्यवस्था भारताचे जागतिक आर्थिक चढ-उतारांपासून संरक्षण करते, म्हणूनच गेल्या काही दशकांमध्ये आलेल्या मोठ्या जागतिक मंदीच्या काळातही भारतीय अर्थव्यवस्थेवर फारसा परिणाम न होता वेगाने वाढ होत राहिली. एकूणच, असे म्हणता येईल की मातीची धूप 'डोमिनो इफेक्ट' आहे. त्यामुळे नैसर्गिक, सामाजिक आणि आर्थिक प्रक्रियांवर नकारात्मक परिणाम होतो. हे स्पष्ट आहे की आजच्या काळात माती हे सर्वात महत्त्वाचे संसाधन आहे. भारतासारख्या देशासाठी ती केवळ पोट भरण्यासाठी आवश्यक नाही, तर संपूर्ण अर्थव्यवस्थेचा आधार आहे. अशा परिस्थितीत, नैसर्गिक पद्धतीने जमिनीची सुपीकता परत आणण्याची गरज आहे. त्यासाठी आपल्याला मातीचे भौतिक, रासायनिक आणि जैविक आरोग्य पुनर्संचयित करावे लागेल. सध्या, वापरल्या जात असलेल्या एकूण खतांपैकी फक्त सहा टक्के ही सेंद्रिय स्त्रोतांची खते आहेत. त्यामुळे रासायनिक खतांवरील अवलंबित्व कमी करून सेंद्रिय खतांवर आधारित शेतीला प्रोत्साहन देण्याची गरज आहे; मात्र यामध्ये धान्य उत्पादनात घट होण्याची शक्यता आहे. भारत हा केवळ कृषीप्रधान देश नाही, तर समृद्ध निसर्ग-केंद्रित कृषी परंपरादेखील आहे. ती मातीची क्षमता, हवामान, पाण्याची उपलब्धता यांच्या सुसंवादावर आधारित आहे. ती पुनरुज्जीवित झाल्यास माती, पाणी आणि हवेची गुणवत्ता पुन्हा रुळावर आणली जाऊ शकते; पण त्यासाठी माती, पाणी आणि सार्वजनिक आरोग्य केंद्रस्थानी ठेवून आणि शेतकऱ्यांना विश्वासात घेऊन धोरणे आखावी लागतील. त्यासाठी वैज्ञानिक विचारांची, तंत्रज्ञानाचा योग्य वापर करण्याची आणि प्रबळ राजकीय इच्छाशक्तीची गरज आहे. गेल्या काही दशकांमध्ये, सरकारी पातळीवर केलेले प्रयत्न हे केवळ कृषी उत्पादन आणि त्याच्या आर्थिक पैलूंवरच राहिले आहेत. मातीचे आरोग्य हा शेतकऱ्यांच्या अजेंड्यावरचा विषय दिसत नाही, हे अलीकडच्या काही शेतकरी आंदोलनांच्या मागणीवरून समजू शकते. मातीची स्थिती बिघडण्याच्या जटिल समस्येवर कोणताही सोपा उपाय नाही आणि माती आणि पाण्याची समस्या आमच्या शेतातून भोजन थाळीपर्यंत पोहोचली आहे. अशा परिस्थितीत या भीषण समस्येची दखल घेऊन शासन, समाज आणि वैयक्तिक पातळीवर प्रयत्न करण्याशिवाय पर्याय उरलेला नाही.

मिलिंद बेंडाळे

# मतदान प्रक्रिया योग्यच! मतटक्क्यात वाढ ही सामान्य बाब असल्याचा दावा, काँग्रेसच्या आक्षेपांचे निवडणूक आयोगाकडून खंडन

नवी दिल्ली : राज्यातील विधानसभा निवडणुकीमध्ये संध्याकाळी पाच ते रात्री साडेअकरा या वेळेत वाढलेला मतांचा टक्का ही सामान्य बाब असून मतदानाच्या प्रक्रियेमध्ये कोणताही गैरप्रकार झालेला नाही, असे स्पष्टीकरण मंगळवारी केंद्रीय निवडणूक आयोगाने दिले.

मतांच्या वाढीव टक्क्याबाबत काँग्रेसने शंका घेतली होती. संध्याकाळी ५ ते ६ या एका तासात सुमारे ७६ लाख मतदान झाल्याचा दावा काँग्रेसने केंद्रीय निवडणूक आयोगाला पाठवलेल्या पत्रात केला होता.

तसेच, मतदार यादीत मतदारांची मोठ्या प्रमाणावर भर घालण्यात आल्याचाही आरोप केला होता. या दोन्ही मुद्द्यांचे आयोगाने मंगळवारी काँग्रेसला पाठवलेल्या पत्रामध्ये शंकानिरसन केले.

संध्याकाळी ५ वाजता मतांचा टक्का ५८.२२ होता, तो रात्री ११.३० वाजता ६५.०२ टक्के झाला. आयोगाने घोषित केलेली मतांची अंतिम टक्केवारी ६६.०५ इतकी होती. हा वाढीव टक्का एकत्रित मतांची आकडेवारी असते, त्यामध्ये कोणतीही चूक वा गैरप्रकार झालेला नाही. प्रत्यक्षात झालेल्या मतदानाची टक्केवारी बदलणे अशक्य असते. प्रत्येक उमेदवाराच्या मतदान केंद्रावरील प्रतिनिधीला '१७-क' अर्ज देणे बंधनकारक असते. मतदानाची प्रक्रिया थांबल्यानंतर मतदान केंद्रावरच मतांची आकडेवारी असलेला '१७-क' हा अर्ज दिला जातो. '१७-क'मधील अर्जामध्ये नंतर कोणताही बदल केला जात नाही, असे आयोगाचे म्हणणे आहे.

'व्होटर टर्नआऊट' ॲपवर साडेपाच वाजता प्रसिद्ध करण्यात आलेली मतांची टक्केवारी त्यावेळी उपलब्ध झालेल्या माहितीवर आधारित असते. अनेकदा सर्व मतदान केंद्रांवरील आकडेवारी विविध कारणांमुळे तात्काळ उपलब्ध होत नाही. ती उशिरा पोहोचत असल्यामुळे रात्री साडेअकरा वाजता मतांची टक्केवारी वाढलेली दिसते, असा युक्तिवाद आयोगाने केला आहे.

प्रत्येक टप्प्यावर सर्व पक्षांचा सहभाग

मतदार यादीतून मतदारांची नावे मनमानी वा स्वैरपणे वगळली वा ती समाविष्ट केल्याचा आरोप आयोगाने फेटाळला. जुलै ते नोव्हेंबर या पाच महिन्यांमध्ये सुमारे ४७ लाख मतदारांची भर पडली. ५० मतदारसंघांमध्ये सरासरी ५० हजार नव्या मतदारांना सामील केले गेले व त्यातील ४७ मतदारसंघांमध्ये महायुतीचा विजय झाला, असा आरोप काँग्रेसने केला होता. काँग्रेसची ही माहिती चुकीची असून फक्त ६ मतदारसंघांमध्ये एकूण ५० हजार मतदारांची भर पडली, असा दावा आयोगाने केला आहे. मतदान यादी तयार करण्याच्या प्रक्रियेमध्ये सर्व राजकीय पक्षांना सहभागी करून घेतले जाते व ही प्रक्रिया अत्यंत पारदर्शी असल्याचेही आयोगाने नमूद केले आहे.

निवडणूक प्रक्रियेच्या प्रत्येक टप्प्यावर सर्व राजकीय पक्षांना विश्वासात घेतले जाते. घाऊक पद्धतीने मतदारांची नावे वगळण्यात आलेली नाहीत. प्रत्येक मतदारसंघात सरासरी २७७९ नावे वगळली. यात निधन, स्थलांतर किंवा दुबार मतदारांचा समावेश होता, असे निवडणूक आयोगाने स्पष्ट केले.

**आयोगाचे उत्तर**

आकडेवारी उशीरा हाती आल्यामुळे वाढ, मतदार यादी अद्ययावत करण्याची काटेकोर प्रक्रिया, ५० हजारांची भर केवळ सहा मतदारसंघांमध्ये

**काँग्रेसचे आरोप**

पाच ते ११.३० या वेळेत मतटक्का वाढला, यादीतून नावे स्वैरपणे वगळली अथवा समाविष्ट केली, ५० मतदारसंघांत ५० हजार नवे मतदार

# माजी गृहसचिव मणिपूरच्या राज्यपालपदी; आरिफ मोहम्मद खान यांच्याकडे केरळऐवजी बिहारची जबाबदारी

नवी दिल्ली : गेल्या वर्षभरापासून अशांत असलेल्या मणिपूरमध्ये माजी केंद्रीय गृहसचिव अजय कुमार भल्ला यांची राज्यपाल म्हणून नियुक्ती करण्यात आली. मंगळवारी मणिपूरसह केरळ तसेच बिहारमध्ये नवे राज्यपाल नेमण्यात आले. ओडिशाचे राज्यपाल रघुबर दास यांचा राजीनामा राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी स्वीकारला आहे.



सर्वाधिक काळ गृहसचिव राहिलेल्या भल्ला यांच्यावर मणिपूर जबाबदारी देण्यात आली आहे. मे २०२३ पासून वांशिक संघर्ष सुरू असताना तेथील परिस्थिती नियंत्रणात आणण्यात अपयश आल्याबद्दल गृह विभागावर टीकाही झाली होती. असे असताना आता याच काळात गृहसचिव असलेल्या भल्लांना मणिपूरचे राज्यपालपद देण्याच्या केंद्र सरकारच्या निर्णयाबाबत आश्चर्य व्यक्त होत आहे.

ओडिशात दास यांच्या जागी मिझोरामचे राज्यपाल हरि बाबू कंभपती यांची नियुक्ती करण्यात आली, तर केरळचे राज्यपाल आरिफ मोहम्मद खान यांच्याकडे बिहारचे राज्यपालपद सोपवण्यात आले आहे. राज्यातील डाव्या आघाडीच्या सरकारविरोधात खान यांचा संघर्ष सुरू आहे. यापूर्वीचे बिहारचे राज्यपाल असलेले राजेंद्र आर्लेकर यांच्यावर केरळची जबाबदारी असेल. तर मिझोरामच्या राज्यपालपदी माजी लष्करप्रमुख व्ही.के. सिंह यांना नेमण्यात आले. नवे राज्यपाल पदभार स्वीकारतील त्या दिवसापासून ही नियुक्ती असेल असे राष्ट्रपती भवनाने स्पष्ट केले आहे.

भल्ला हे सर्वाधिक काळ गृहसचिवपदी होते. या वर्षी ऑगस्टमध्ये त्यांनी पाच वर्षे पूर्ण केली. आसाम-मेघालय केडरचे १९८४ च्या तुकडीचे ते भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी आहेत. व्ही.के. सिंह हे दोन वेळा केंद्रात मंत्री होते. उत्तर प्रदेशच्या गाझियाबादमधून ते २०१४ व १९ मध्ये निवडून आले होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अपमान केल्याबद्दल जो पर्यंत अमित शहा राजीनामा देत नाही तो पर्यंत कॉंग्रेस पक्ष आंदोलन सुरू ठेवणार : खा. प्रणिती शिंदे

## खासदार प्रणिती शिंदे यांच्या उपस्थितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सन्मानार्थ सन्मान मोर्चा, अमित शहा यांनी राजीनामा द्यावा अशी मागणी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : राज्यसभेत अमित शहा यांनी त्यांच्या भाषणात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विषयी अपमानजनक वक्तव्य केल्याबद्दल त्यांचा जाहीर निषेध करण्यासाठी, अमित शहांनी माफी मागावी, त्यांना मंत्रीमंडळातून काढून टाकावी या मागणीसाठी, सोलापूर शहर कॉंग्रेसच्या वतीने खासदार प्रणिती ताई शिंदे, माजी आमदार प्रकाश यलगुलवार, शहर अध्यक्ष चेतनभाऊ नरोटे यांच्या प्रमुख उपस्थितीत, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सन्मानार्थ डॉ. बाबासाहेब आंबेडकर सन्मान मोर्चा डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा पासून नवीन जिल्हाधिकारी कार्यालय पर्यंत काढण्यात आली. यानंतर निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार यांना निवेदन देऊन अमित शहा यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यात आली.

यावेळी अमित शहा विरोधात जोरजोरात घोषणाबाजी करण्यात आली.



## थोडक्यात...




### उशाला ठेवलेला मोबाईल अज्ञात चोरट्याने पळवला

सोलापूर, (प्रतिनिधी) : उशाखाली मोबाईल ठेवून फिर्यादी रवींद्र मनोहर घोडेराव (वय-४२,रा.गालिब नगर,येडशी रोड, धाराशिव) हे झोपी गेले असता अज्ञात चोरट्याने त्यांचा मोबाईल चोरून नेल्याची घटना २१ डिसेंबर रोजी रात्री सोलापूर एसटी स्टँड येथील बस स्थानक जवळ घडली. याप्रकरणी रवींद्र घोडेराव यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार चुंगे हे करीत आहेत.

### हँडल लॉक केलेली दुचाकी पळवली

सोलापूर, (प्रतिनिधी) : हँडल लॉक करून ठेवलेली दुचाकी क्रमांक एम एच.१३.ईडी.०५८८ हे अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना २१ ते २२ डिसेंबर दरम्यान संगमेश्वर नगर अक्कलकोट रोड येथे घडली.याप्रकरणी राजरत्न लक्ष्मीकांत चौधरी (वय-२८,रा.संगमेश्वर नगर) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस नाईक गायकवाड हे करीत आहेत.

## दारूसाठी पैसे दिले नाही म्हणून वृद्धास मारहाण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर, (प्रतिनिधी) : म्हाडा कॉलनी जुळे सोलापूर येथे दारू पिण्यासाठी पैसे दे नाहीतर मी घरातील भांडी विकतो असे म्हणून वृद्धास मारहाण केल्याची घटना २२ डिसेंबर रोजी घडली. याप्रकरणी शुभम सुनील सर्वगोड (वय-२८,रा.संयोग नगर, म्हाडा कॉलनी) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यांच्या फिर्यादीवरून वैभव सुनील सर्वगोड याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

यात अधिक माहिती अशी की, फिर्यादीच्या राहते घरासमोर संशयित वरील आरोपी आणि फिर्यादीस दारू पिण्यासाठी पैसे दे नाहीतर मी घरातील भांडी विकतो असे म्हणून फिर्यादीच्या आजोबांना मारहाण केली असे फिर्यादीत नमूद आहे. पुढील तपास पोह.फुलारी हे करीत आहेत.

## श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरास एक लक्ष रुपयांची देणगी, आजीची इच्छा नातीकडून पूर्ण



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : अ‍ॅड. जानवी जोशी, मुंबई यांनी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरास दिनांक २३ डिसेंबर रोजी एक लक्ष रुपयाची देणगी दिल्याची माहिती व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली.

अ‍ॅड जोशी ह्या मे. उच्च न्यायालय, मुंबई येथे वकिली करत आहेत. त्यांनी आपल्या आजी सुलोचना जोशी वय ९४ वर्ष यांच्या इच्छेनुसार सदरची देणगी दिली आहे. त्या श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या निस्सिम भक्त असून, आपल्या आजीची इच्छा पूर्ण करण्यासाठी श्रीक्षेत्र पंढरपूर येथे आल्या होत्या. त्यावेळी त्यांनी देणगी दिली आहे. त्याबद्दल देणगीदार भाविकाचा मंदिर समितीच्या वतीने मंदिर समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी श्रींची प्रतिमा व उपरणे देऊन येथोचित सन्मान केला.

दोन पिढ्यांना जोडणारी गोष्ट म्हणजे नातवंड. आजी आजोबा हे आपल्या मुलापेक्षा नातवंडावर जास्त प्रेम करतात. कारण, आपल्या तिसऱ्या पिढीकडे आपले सर्व संस्कार गेले पाहिजे हा त्यामागील हेतू असावा. आपल्या आजीची इच्छा नातीने पूर्ण करून, आजी व नाती मधील संबंध दृढ केले आहेत. सुलोचना जोशी यांना श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरास देणगी देण्याची इच्छा होती. परंतु, काही कारणास्तव मंदिर समितीस देणगी देता आली नाही. पण, वकिली व्यवसाय करत असलेल्या त्यांच्या नातीने आपल्या आजीची इच्छा पूर्ण केली आहे. तसेच त्या आपल्या आजीला दर्शनासाठी देखील घेऊन आल्या होत्या.

**ऑनलाइन देणगीसाठी क्यू आर कोड प्रणाली, तात्काळ व्हाट्सअप द्वारे देणगी पावती**

सद्यस्थितीत, नाताळ / ख्रिसमस उत्सव सुरू असल्याने भाविकांची दर्शन रांगेत म ोठ्या प्रमाणात गर्दी आहे. या भाविकांना मंदिर समितीमार्फत पुरेशा प्रमाणात सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे. देणगी देण्यासाठी आरटीजीएस, संकेतस्थळ व मोबाईल प बरोबर नव्याने क्यू आर कोड ची संगणक प्रणाली विकसित केली असून, या प्रणाली द्वारे कोड स्कॅन करून मंदिर समिती थेट देणगी देता येणार आहे. तसेच देणगी प्राप्त झाल्याची व्हाट्सअप द्वारे पावती देखील तात्काळ मिळत आहेत. देणगीदार इच्छुक भाविकांनी या प्रणालीचा लाभ घ्यावा व अधिक माहितीसाठी संत तुकाराम भवन येथील कार्यालयात संपर्क करावा अशी आवाहन मंदिर समिती मार्फत करण्यात येत आहे.

## मंदिर समिती मार्फत आयोजित केलेल्या वनभोजनाचा हजारो भाविकांनी घेतला लाभ



### विष्णूपद उत्सव २०२४ : दर्शनासाठी भाविकांची गर्दी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : मार्गशिर्ष शुध्द ०१ ते मार्गशिर्ष वद्य ३० या कालावधीत श्री विठ्ठलाचे वास्तव्य विष्णूपदावर असते, अशी धारणा आहे. त्यामुळे महिनाभर विष्णूपद येथे दर्शनास भाविकांची गर्दी असते. यावर्षी दिनांक ०२ ते ३० डिसेंबर २०२४ दरम्यान विष्णूपद उत्सव संपन्न होत असून, या उत्सवास दिनांक ०२ डिसेंबर पासून सुरवात झाली आहे. विष्णुपद मंदिरात भाविकांची दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात गर्दी होत आहे. आज दिनांक २४ डिसेंबर रोजी मंदिर समिती मार्फत दुपारी बारा ते तीन या वेळेत वनभोजनाचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये सुमारे २५०० ते ३००० भाविकांनी वनभोजनाचा लाभ घेतल्याची माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.

**सुमारे २५०० ते ३००० भाविकांनी वनभोजनाचा लाभ घेतल्याची माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांची माहिती**

गोपाळपूर रोडवरील विष्णूपद मंदिर येथे मंदिर समिती मार्फत भाविकांना पुरेसा सोई सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने चांगली स्वच्छता व्यवस्था, पिण्याचे पाणी, दर्शन रांग व्यवस्थापनासाठी बॅरीकेटिंग व सुरक्षा रक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे. विष्णुपद मंदिर येथे वनभोजनाची प्रथा असल्याने प्रती वर्षाप्रमाणे मंदिर समिती मार्फत वनभोजनाचे आयोजन करण्यात आले होते. या वनभोजनाचे नियोजन, विभाग प्रमुख बलभीम पावले व राजेश पिटले यांना देण्यात आले होते. मंदिर समिती मार्फत देण्यात येणाऱ्या सोई सुविधा बाबत भाविकांनी समाधान व्यक्त केल्याचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी यावेळी दिली.

स्वेरीमध्ये 'अवकाश महायात्रे'चे उद्‌घाटन

शास्त्रज्ञ डॉ. काशिनाथ देवधर यांचे प्रतिपादन

# सर्वसामान्य माणसांना विज्ञानाविषयी जनजागृती व्हावी यासाठी 'विज्ञान भारती'ची निर्मिती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : 'विज्ञानामुळे ग्रामीण भागातील सर्वसामान्य जनतेला फायदा व्हावा यासाठी माझे अविरत कार्य सुरू आहे. विज्ञानाच्या माध्यमातून समाजातील प्रश्न कसे सोडवायचे याबद्दल जनजागृतीचे कार्य हाती घेतले आहे. विज्ञान भारतीची निर्मिती सर्वसामान्य माणसांसाठी विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या माध्यमातून विकसित भारतासाठी योगदान देण्यासाठी झाली आहे. हे कार्य अखंड सुरु राहील.' असे प्रतिपादन शस्त्रास्त्र संशोधन आणि विकास स्थापना (ए.आर.डी.इ.- अरमामेंट रिसर्च अँड डेव्हलपमेंट एस्टयाब्लिशमेंट) चे सेवानिवृत्त समूह संचालक शास्त्रज्ञ डॉ.काशिनाथ देवधर यांनी केले.







अंतराळातील महत्वाची माहिती देण्यासाठी भारतीय अंतराळ संस्थेने (इस्त्रो) मोहीम हाती घेतली असून केंद्र सरकारचा उपक्रम असलेल्या इस्त्रोने अंतराळाच्या ज्ञानाचा सर्वांना लाभ घेता यावा यासाठी एक विशेष बस तयार केली असून या बसच्या माध्यमातून चंद्र, सूर्य, ग्रह, तारे जवळून पाहण्याची अनुभूती घेत अंतराळाची वैज्ञानिक माहिती घेता येणार आहे. 'विज्ञान भारती' आणि 'इस्त्रो' यांच्या संयुक्त विद्यमाने या अंतरीक्ष महायात्रेचे उदघाटन ए.आर.डी.इ.चे सेवानिवृत्त समूह संचालक शास्त्रज्ञ डॉ.काशिनाथ देवधर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते विज्ञान आणि सीमेवरील अवघड कार्य यावर सविस्तर माहिती देत होते. महाराष्ट्र गीत व स्वेरी गीतानंतर पदवी अभियांत्रिकीच्या प्रथम वर्ष विभागाचे प्रमुख डॉ.यशपाल खेडकर यांनी शास्त्रज्ञ डॉ.काशिनाथ देवधर यांनी देशासाठी केलेल्या कार्याची व दिलेल्या योगदानाची सविस्तर व थक्क करणारी माहिती दिली. स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे प्रास्ताविकात म्हणाले की, 'माणसाने सर्वप्रथम आपल्या देशावर, राज्यावर, जिल्ह्यावर, तालुक्यावर, आपल्या परिसरावर व आपल्या माणसांवर प्रेम करावे. हे करत असताना आपण समाजासाठी काहीतरी केले पाहिजे ही मानसिकता देखील बाळगली पाहिजे. 'उच्च शिक्षण' किती घेतले? यापेक्षा त्याच्यावर 'संस्कार' किती आहे ? याला आज प्राधान्य दिले जाते. यासाठी विद्यार्थ्यांनी 'लर्निंग थ्रू एक्सपोजर' साठी तयार रहावे.' असे आवाहन देखील त्यांनी केले. पुढे बोलताना प्रमुख पाहुणे शास्त्रज्ञ डॉ. देवधर म्हणाले की, 'माझी भेट शास्त्रज्ञ डॉ.अनिल काकोडकर यांच्याशी झाली तेंव्हा ते म्हणाले, 'विज्ञानाविषयी जनजागृती करणार असाल तर पंढरपूरजवळ गोपाळपूर येथील स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगला एकदा भेट द्या' असे सांगितल्याने मी स्वेरीत आलो. पुढे ते म्हणाले 'रणगाड्याची अचूकता वेगवेगळ्या माध्यमातून पाहिली जाते. रणगाड्याची अचूकता वाढविण्याचे कार्य देवधरांकडे होते. या कार्यातून मला सर्वप्रथम प्रेरणा मिळाली. देशासाठी जवान अहोरात्र कार्य करतात कारण शत्रू अचानकपणे हल्ला करतो. यासाठी वेळेकडे न पाहता रात्रंदिवस कामात कसे राहायचे व देशासाठी आपला वेळ कसा द्यायचा हे त्यातून शिकता आले.' असे सांगून त्यांनी शास्त्रज्ञ प्रा.सतीश धवन, विक्रम साराभाई, न्यूटनचे नियम, डीआरडीओ संस्था, चांद्रयान, मंगळयान यासाठी इस्त्रोतील कार्य, विविध प्रयोग या प्रमुख बाबींवर लक्ष वेधून त्याबाबत सविस्तर माहिती दिली. उदघाटनाच्या अर्थात पहिल्या दिवशी अनेक शाळा, महाविद्यालयांतील विद्यार्थी व शिक्षकांनी भेटी दिल्या. आता दुसरा दिवस बुधवार (दि.२५ डिसेंबर) ही प्रदर्शनाची शेवटची संधी असून आणखी शाळा स्वेरीकडे येत आहेत. यावेळी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (पॉलिटेक्निक) चे प्राचार्य डॉ.एन. डी. मिसाळ, इंजिनिअरिंगच्या उपप्राचार्या डॉ.मिनाक्षी पवार, संशोधन अधिष्ठाता डॉ.ए.पी.केणे, प्रशासन अधिष्ठाता डॉ.आर.आर. गिड्डे, शैक्षणिक अधिष्ठाता डॉ.एम. पी.ठाकरे, इन्फ्रास्ट्रक्चर अधिष्ठाता डॉ.डी. ए. तंबोळी, एम.बी. ए.चे विभागप्रमुख डॉ. के.पी. गलानी, मेकॅनिकल इंजिनिअरिंगचे विभागप्रमुख डॉ.एस.बी.भोसले यांच्यासह प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालक उपस्थित होते. 'हर काम देश के नाम' या विद्यार्थ्यांना दिलेल्या संदेशानुसार डॉ. देवधरांचे कार्य अक्षरशः डोळ्यात अंजन घालण्यासारखे आहे, हे मात्र नक्की.

**जेष्ठ शास्त्रज्ञ डॉ.कलामांनी थोपटली शास्त्रज्ञ डॉ. देवधरांची पाठ**

**देशासाठी आपले जीवन व्यतीत करणारे डॉ. देवधर म्हणाले की, 'माझ्या एका प्रकल्पासाठी थोर शास्त्रज्ञ डॉ. ए.पी.जे अब्दुल कलामांनी ४० मिनिटांचा वेळ दिला आणि प्रोजेक्टचा रिव्ह्यू घेतला. आणखी साधनांची आवश्यकता आहे. असे सूचित केल्यावर त्यांनी प्रकल्प पाहून 'वेलडन' म्हणत माझी पाठ थोपटली. डॉ. कलाम सरांनी केलेला गौरव हाच खरा माझ्यासाठी सर्वोत्तम पुरस्कार आहे.**

दैनिक
# यश सिद्धि न्यूज



## थोडक्यात...




### बनावट दस्त तयार करून फसवणूक, गुन्हा दाखल

सोलापूर (प्रतिनिधी) बनावट खरेदी दस्त तयार करून फसवणूक केल्याप्रकरणी एका जनाविरुद्ध एम आयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना दि.२६ जुन २०२४ रोजी जगदंबा नगर औद्योगिक वसाहत येथे घडली.याप्रकरणी नंदकिशोर श्रीकिसन राठी (वय-७२,रा. पूर्व मंगळवार पेठ यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अशोक बाळकृष्ण कोंडा (वय-६८,रा.पदमानगर न्यू, पाच्छापेठ) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की,फिर्यादी व सौ कांबळे व कैलासवासी संभाजी कांबळे यांच्या मौजे कसबा सोलापूर सर्वे नंबर १७२/२अ/१ मध्ये प्लॉट नंबर २५ यांचे फिर्यादी यांची मान्यता न घेता वरील संशयित आर-ोपी याने त्या जागेचे एकत्रित चतुर:सीमा टाकून तो प्लॉट संशयित आरोपी याने श्री बाळकृष्ण सदाफुले (वय-५४-,रा.उत्तर सदर बझार लष्कर) व श्री राजू घोडके (वय-५४, प्लॉट नंबर ४५ न्यू मल्लिकार्जुन नगर,एमआयडीसी) यांच्यासोबत रजिस्टर खरेदी दस्त क्रमांक ४२२३/२०२४ सपउ-२ दि.२६ जुन २०२४ अन्वय बनावट रजिस्टर खरेदी दस्त तयार करून फिर्याद यांची फसवणूक केली आहे.असे फिर्यादीत म्हटले आहे. पुढील तपास पोसई.गाढवे हे करीत आहेत.

### तू माझे पैसे कधी देतो असे म्हणत तरुणास मारहाण, गुन्हा दाखल

सोलापूर (प्रतिनिधी) कामाला जाताना सम्राट चौक येथे आले असता तु माझे पैसे कधी देतो असे म्हणून मारहाण केल्याची घटना २३ डिसेंबर रोजी सकाळी साडेनऊच्या सुमारास घडली.याप्रकरणी दीपक बाळू मोरे (वय-२८,रा. प्रभाकर महाराज मंदिर जवळकर वस्ती) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्यादी दिली.त्यांच्या फिर्यादीवरून अण्णा होनराव (रा. प्रभाकर महाराज मंदिर जवळकर वस्ती) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

यात अधिक माहिती अशी की,फिर्यादी हा कामाला जाताना उपासे हॉस्पिटल सम्राट चौक येथे संशयित आरोपी हा तेथे आला व चल चहा पिऊ असे म्हणून फिर्यादी व संशयित आरोपी हे चहा पिण्यासाठी गेले असता रिक्षा थांबवून संशयित आरोपीने फिर्यादीस तुला दिलेले पैसे तु मला पूर्ण दिले नाही तू माझे पैसे कधी देतो असे म्हणाला फिर्यादीने मी तुझे पैसे पूर्ण दिले आता कशाला पैसे मागतो असे म्हणल्यावर फिर्यादीस शिवीगाळ व मारहाण करून रस्त्यावर पडलेली वीट उचलून डोक्यास डाव्या बाजूस मारून जखमी केल्याचे फिर्यादीत नमूद आहे.या घटनेचा पुढील तपास पोह.साळुंखे हे करीत आहेत.

# नळदुर्ग शहरात नगर परिषदेच्या दोन वर्षात तब्बल १६५ कोटी रुपयाची कामे प्रगती पथावर

## मुख्याधिकारी लक्ष्मण कुंभार यांची माहिती; काही कामे अडचणीमुळे अर्धवट अवस्थेत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे

नळदुर्ग या ऐतिहासिक शहरात नगर पालिकेवर प्रशासकीय कालावधीत ते आजतागायत २०२२ ते २०२४ या दोन वर्षाच्या कालावधीत अतिशय चांगल्या पद्धतीने कामे चालु असुन तब्बल १६५ कोटी रुपयाच्या खर्चाचे विकास कामे पूर्ण झाले असून तर काही कामे प्रगती पथावर आहेत तर काही काम जागे आभावी अर्धवट अवस्थेत आहेत.

हे काम पाहता नळदुर्ग नगरपालिकेचे कर्तव्यदक्ष मुख्याधिकारी लक्ष्मण कुंभार यांनी नळदुर्ग या ऐतिहासिक शहराचा सर्वांगीण विकास केला आहे नळदुर्ग नगरपालिकेवर दोन वर्षाच्या प्रशासकीय कालावधीत खूप चांगल्या पद्धतीने कामे झाले असून नळदुर्ग नगर परिषद मार्फत २०२१ २०२२ यामध्ये नागरी दलित्तेतर योजना महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्सान योजना अंतर्गत एकुण १६ कामा साठी २ कोटी ७६ लाख रुपयचा निधी प्राप्त झाला त्यापैंकी




सर्व कामे पूर्ण झाली आसुन महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्सान महा अभियाना राज्यस्तर योजने अंतर्गत एकुण कामे करण्या करिता शहरातील रस्ते व गटारी साठी ९३ कोटी रुपये मंजूर झाले आहेत हे काम प्रगतीपथावर आहे कारण हे काम पी डब्लू डी आहे पण या ही कामाचा प्रस्ताव मुख्याधिकारी लक्ष्मण कुंभार यानीच पाठवला होता हे सर्व काम प्रशासकीय कालावधीतच झाले आहेत यात काही शंका नाही.

गोलाईत बसव सृष्टी साठी ५ कोटी कै वसंतराव नाईक उद्याना साठी ५ कोटी , नालंदा बुद्धविहार सभागृह करिता २ कोटी . लोकशाहीर अण्णाभाऊ साठे सभागृह करिता १ कोटी ३० लाख रुपये , गणपती विसर्जन मार्ग विकसीत करणे ७५ लाख रुपये डॉ बाबासाहेब आंबेडकर उद्याना करिता १ कोटी २५ लाख रुपये नविन पाणी पुरवठा योजने अंतर्गत २४ लाख लिटर्स टाकी आणि ६ . २५ चडऊ नविन अद्यायावत फिल्टर हायमस्ट विद्युत पोल शहरात विविध ठिकाणी गार्डन विकसीत करण्यात आले. शिवाय नळदुर्ग ऐतिहासिक शहराचा कायापालट होण्याकरिता विविध भागात कोट्यावधी रुपयाचे कामे चालू असून २०२२ - २०२३ या वर्षात एकूण ३२ कामापैकी २३ कामे पूर्ण केली आहे. या वर्षातील २९ लाख रुपयाचे कामे प्रगती पथावर आहेत तसेच २०२२ - २०२३ मध्ये लोकशाहीर आण्णाभाऊ साठे नागरीवस्ती सुधार योजना , नागरी दलित्तेतर योजना व वैशिष्ठ्य पर्ण योजना नागरी स्थानी स्वराज्य संस्थेच्या परीक्षेत्रात अधिसूचित विशिष्ट नागरी सेवा व सुविधा पुरवणे




विविध योजना अंतर्गत ३२ कामासाठी ६ कोटी ७५ लाख निधी प्राप्त झाला होता त्यापैकीपाच कोटी ३० लाख रुपये रकमेचे २६ कामे पूर्ण झाले आहेत काही कामे अडचण असल्याने ते कामे अर्धवट अवस्थेत आहेत वरील प्रमाणे विविध योजना अंतर्गत ३६ कामासाठी मंजुरी असून १७ कोटी ५२ लाख रुपये चा निधी मंजूर झालेला आहे त्यापैकी रक्कम १ कोटी ६५ लाख रकमेची एकुण १२ कामे पुर्ण झाले आहेत उर्वरित सर्व कामे प्रगती पथावर असून लवकरात लवकर पूर्ण होण्याच्या मार्ग क्रमणात आहेत तसेच आम्रत २.० योजने अंतर्गत शहरात वाढीव पाणी पुरवठा करण्याकरिता ४३ कोटी रूपयाचा निधी प्राप्त झाला असून शहरामध्ये प्रगती पथावर कामे चालू आहेत.

**२०२४ -२०२५ योजने अंतर्गत एकुण ४ कामासाठी एकुण मंजर निधी ५ कोटी ७१ लाख रुपये निधी मंजूर झाले असून सदर कामाचे निवेदा व प्रक्रिया पार पाडण्यात येत आहे . वरिल सर्व कामे गुणवत्ता पुर्ण करून घेण्यासाठी शासन कटीबद्ध आसुन उर्वरित कामे नविन पाईप लाईन अंतरणे रस्ते विकास करणे करीता वेळ लागत आसल्याने संबधीत गुत्तेदारानी तात्काळ करून घ्यावेत आसा आदेश देण्यात आला आहे .**

# वैनतेय इग्लिश मिडीयम स्कुल निफाड जिल्हास्तरीय टेनिस क्रिकेट स्पर्धेमध्ये द्वितीय पारितोषिक




निफाड/प्रतिनिधी : टेनिस क्रिकेट असोसिएशन महाराष्ट्र व नाशिक जिल्हा टेनिस क्रिकेट असोसिएशन नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने १४ वर्षा आ-तील टेनिस क्रिकेट अजिंक्यपद स्पर्धा व निवड चाचणी नाशिक येथील दत्ता मोगरे स्टेडियम येथे उत्साहात संपन्न झाली. त्यामध्ये निफाड येथील

वैनतेय इग्लिश मिडीयम स्कुल चा मुलाचा संघ उपविजेता ठरला त्यांचे जिल्ह्यातून सर्वत्र अभिनंदन होत आहे.

या स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी भारतीय व महाराष्ट्र टेनिस क्रिकेट असोसिएशनच्या सचिव मीनाक्षी गिरी, महाराष्ट्र टेनिस क्रिकेट असोसिएशनचे उपाध्यक्ष विलास गिरी ,महाराष्ट्र टेनिस क्रिकेट असोसिएशनच्या महिला अध्यक्ष धनश्री गिरी, नाशिक जिल्हा टेनिस क्रिकेट असोसिएशनचे सचिव विलास गायकवाड, सहसचिव धनंजय लोखंडे, विलास गिरी व क्रीडा शिक्षक , इत्यादी उपस्थित होते. नाशिक जिल्हा सचिव विलास गायकवाड यांनी विद्यार्थ्यांना टेनिस क्रिकेट खेळाबद्दल नियम व माहिती सांगितली. जिल्हास्-तरीय टेनिस क्रिकेट स्पर्धेसाठी जिल्ह्यातून ७४ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला या स्पर्धेचा अंतिम सामना वैनतेय इंग्लिश स्कूल व के के वाघ इंग्लिश स्कूल सरस्वती नगर नाशिक यांच्यात होऊन के के वाघ ने एक गुणांनी हा सामना आपल्या खिशात टाकला. वैनतेय संघाने चांगले प्रयत्न करून या अंतिम सामन्यात चांगली चुरस निर्माण करत उपविजेता ठरला. दक्ष गायकवाड ,आदित्य मोरे ,वेदांत शेजवळ,साई जाधव यांची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल रानडे विद्या प्रसारक मंडळाचे कार्यकारी विश्वस्त वि.दा.व्यवहारे , संस्थेचे विश्वस्त अँड आप्प-ासाहेब उगांवकर , रतन पाटील वडघुले, किरण कापसे ,राजेंद्र राठी , अँड दिलीप वाघवकर, राजेश सोनी, प्रभाकर कुयटे, मधुकर राऊत विश्वास कराड ,नरेंद्र नांदे, शाळेच्या मुख्याध्यापिका पल्लवी सानप यानि अभिनंदन केले व पुढिल वाढचालीस शुभेच्छा दिल्या .

क्रीडा प्रशिक्षक सुभाष खाटेकर ,विलास गायकवाड यांचे मार्गदर्शन लाभले.

## भावाच्या मुलीला का बघितला या कारणावरून तरुणास मारहाण; दोघांवर गुन्हा दाखल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (प्रतिनिधी) भावाच्या मुलीला का बघितला या कारणावरून तरूणास लाथा बुक्क्यांनी मारहाण करून दुखापत केल्याप्रकरणी दोन जणांविरुद्ध जेलरोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.हि घटना २२ डिसेंबर रोजी रात्री अकरा वाजण्याच्या सुमारास पाथरूड चौक येथे घडली.याप्रकरणी अजय राजू अडसुळे (वय-२९,रा. न्यू पाच्छा) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून तुषार मल्ह-ारी शिंदे व सौदागर क्षीरसागर (रा. सोलापूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की,फिर्यादी हे ओम मेडिकल सम ोर फरशीच्या कट्ट्यावर बसले-ले असताना तुषार शिंदे याने भावाच्या मुलीला का बघितला या कारणावरून लाथा बुक्क्यांनी म ारहाण केली.तसेच सौदागर क्षीरस-ागर याने देखील लोखंडी पाईपने छातीवर,पायावर मारून फिर्यादीला दुखापत करून दुचाकीवर बसवून वालचंद कॉलेजच्या गेट समोर घेऊन जाऊन पुन्हा तेथे लाथा बुक्क्यांनी मारहाण केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.पुढील तपास पोलिस हवलदार शेख हे करीत आहे.

## महाराष्ट्र पोलिसांना दर महिन्याला सेमिनार व प्रोग्राम घेऊन, लोकांशी चांगली मदतपूर्ण वागणूक करण्याचे आदेश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई/प्रतिनीधी : पोलीस स्टेशनमध्ये गेल्यावर पोलीस नीट वागणुक देत नाही अशी सर्वसाम ान्यांची भिती आत्ता दुर होणार आहे, कारण डोंबिवलीतील एका युवकाने पोलीसाच्या असभ्य वागण्याबाबत राज्य मानवी हक्क आयोगाचे दरवाजे ठोठावल्यावर राज्य मानवी आयोगाने महाराष्ट्र पोलीसांना दर महीन्याला सेमिनार व प्रोगाम घेऊन लोकांशी चांगली व मदत पुर्ण वागणूक करण्याचे निर्देश पोलीस महासंचालकाना दिलेले आहेत.

डोंबिवलीत रहाणारा केवल विकमणी हा तरुण क्रिकेटचे टर्फ़ ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ तालुक्यात असलेल्या शिव-ाजीनगर पोलीस स्टशनच्या हददीत

### महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगचा ऐतिहासिक निर्णय

चालवित होता. दि. २० मे २०२३ रोजी त्यांच्या टर्फ़मध्ये क्रिकेटचा सामना सुरु असताना शिव-ाजीनगर पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक सुहास विठठल पाटील ह्यांनी पोलीस गाडीने आपल्या कर्मचा-यासह येऊन केवल विकमणीसह सर्व खेळांडुना घाणेरडया भाषेत शिवीगाळ करत, मारहाण करुन २०० उठा-बशा मारण्यास लावलेल्या होत्या, त्याचा व्हिडीओ सोशल मिडीयावर प्रचंड व्हायरलदेखील झाला होता. त्यापुर्वीदेखील केवल विकमणी ह्यांना मारहाण करुन त्यांच्यावर कायदेशीर कार्यवाहीदेखील करण्यात आ-लेली होती,

हफ़्ता न दिल्यामुळे मारहाण करुन चुकीची वागणूक दिली म्हणुन केवल विकमणी ह्यांनी शासनाच्या विविध विभागाकडे तक्रारी केलेल्या होत्या, त्या तक्रारीवर कोणतीही कार्यवाही न झाल्यामुळे केवल विकमणी ह्यांनी अधिवक्ता गणेश घोलप यांचेमार्फ़त राज्य मानवी हक्क आयोगाकडे तक्रार केलेली होती. त्या तक्रारीवर ठाणे शहर पोलीस आयुक्तासह उल्हासनरचे डीसीपी व अंबरनाथचे एसीपी यांचेसह समर्थ पोलीस स्टेशन, पुणे येथे नियुक्तीस असलेले पोलीस उपनिरीक्षक सुहास विठ्ठल पाटील ह्यांना नोटीस काढुन शपथपत्र सादर करण्याचे निर्देश केलेले होते.

सुनावणी दरम्यान राज्य मानवी हक्क आयोगाने व्हिडीओ चित्रीकरण, सुहास पाटील यांचेविरोधात झालेली कार्यवाही आदींचे अवलोकन करुन पोलीस उपनिरीक्षक सुह-ास विठठल पाटील ह्यांनी ६ आठवडयात केवल विकमणी ह्यांना ५ लाख रुपये नुकसान भरपाईपोटी देत त्यांचेविरोधात भादवि कलम ४४८ व इतर नुसार गुन्हा नोंदविण्याचे, तसेच त्यांची खातेनिहाय चौकशी करत त्यांचेविरोधात दोषारोपपत्र सादर करण्याचे निर्देश ठाणे पोलीस आयुक्तांना देत महाराष्ट्र पोलीसांना दर महीन्याला सेमि नार व प्रोगाम घेऊन लोकांशी चांगली व मदत पुर्ण वागणूक करण्याचे निर्देश पोलीस म हासंचालकाना दिलेले आहेत.

### तीन लाख २७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त

### मौजे रांजणी गावात पकडला मुद्देमाल

# पंढरपूर तालुका पोलिसांची मोठी कामगिरी; अवैध दारू विक्री करणाऱ्यांवर कारवाई

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर तालुका पोलीस ठाणे हद्दीतील मौजे राजनी या गावी सत्तावीस डिसेंबर २०२४ रोजी पंढरपूर उपविभागीय पोलीस अधिकारी भोसले यांना मिळालेल्या माहितीनुसार त्यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच एचडी पीओ सोलापूर कार्यालय स्टॉप व पंढरपूर तालुका पोलीस स्टेशन स्टाफ यांच्या एकत्रित कारवाई करीत मौजे रांजणी गावात सदर कारवाई करण्यात आली.





यावेळी घटनास्थळी प्रदीप आ-वताडे यांच्या राहत्या घरी कारवाई वेळी घेण्याखाली देशी दारूचे एकूण ९६ बॉक्स अवैधरित्या बाळगलेल्या स्थितीत आढळून आले आहेत सदर आरोपी प्रदीप आवताडे यांच्याविरुद्ध मुंबई दारूबंदी कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालू आहे. तसेच सर्व ९६ बॉक्स दारू जप्त करण्यात आले असून सदर देशी दारूची एकूण किंमत ३,२७,००० (तीन लाख २७०००) इतकी रुपये किमतीची सदरची कारवाई माननीय पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, उपविभागीय पोलिस अधिकारी अर्जुन भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली तालुका वरिष्ठ पो-लीस निरीक्षक टी वाय मुजावर, पो-लीस उपनिरीक्षक भारत भोसले, पोलीस कॉन्स्टेबल रोंगे, एस आय तोंडले, पोलीस हेडकॉन्स्टेबल रोकडे यांच्या पथकाने केली सदर कारवाई आहे.

## दुसरे विश्व मराठी संमेलन फेब्रुवारीच्या अखेरीस पुण्यात; 'कवितांचे गाव' साकारण्याची शक्यता

पुणे : राज्य सरकारतर्फे दुसरे विश्व मराठी संमेलन २७, २८ फ ेब्रुवारी आणि १ मार्च असे तीन दिवस पुण्यात आयोजित करण्यात येणार असल्याची घोषणा मराठी भाषा विभागाचे मंत्री उदय सामंत यांनी केली. या संमेलनासाठी आवश्यक ती तयारी करण्याचे निर्देशही त्यांनी दिले. पिंपरी-चिं-चवड येथे झालेल्या मराठी भाषा विभागाच्या आढावा बैठकीत सामंत बोलत होते. विभागाचे सहसचिव नामदेव भोसले, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे उपाध्यक्ष भाऊसाहेब भोईर, मराठी भाषा विभागाचे अवर सचिव नितीन डंगारे, राज्य मराठी विकास संस्थेचे संचालक तथा विश्वकोश निर्मिती मंडळाचे प्रभारी सचिव डॉ. शामकांत देवडे, भाषा संचालक विजया डोणीकर, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाच्या सचिव मीनाक्षी पाटील, विभागाच्या कक्ष अधिकारी ऐश्वर्या गोवेकर या वेळी उपस्थित होत्या.